“साठोत्तरी मराठी मुस्लिम स्त्री आत्मचरित्रांचा विवेचक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या

मानव्य विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच्. डी. पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा प्रारूप आराखडा

संशोधक

शेख लतीफ मैनोद्दीन

(एम.ए., बी.एड्., एम. फिल्.)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. लहू दिगंबर वाघमारे

संशोधन मार्गदर्शक तथा मराठी विभागप्रमुख,

शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

ता. चाकूर, जि. लातूर (महाराष्ट्र)

संशोधन केंद्र

दयानंद कला महाविद्यालय, लातूर

ता. जि. लातूर

नोव्हेंबर २०२४

अनुक्रमणिका

प्रकरण क्रमांक	प्रकरण
	विषय निवडीमागील भूमिका
१	मराठी आत्मचरित्रे संकल्पना व स्वरूप
२	मराठी मुस्लिम साहित्य व आत्मचरित्रे
३	मराठी मुस्लिम स्त्री आत्मचरित्रातील समस्या
४	मराठी मुस्लिम स्त्री आत्मचरित्रातील मुस्लिम संस्कृतीचे चित्रण
५	मराठी मुस्लिम स्त्री आत्मचरित्रातील इस्लामधर्माची शिकवण व सामाजिक वास्तव
६	मराठी मुस्लिम स्त्री आत्मचरित्रांचा वाङ्मयीन दृष्टीकोनातून अभ्यास
७	उपसंहार

विषय निवडीमागील भूमिका :

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. साहित्यात समाजाचेच प्रतिबिंब पडलेले असते. हे विचार सुत्र अलिकडे रूढ झालेले आहे आणि या सुत्रास अनुसरूनच साहित्य लेखनाची सुरूवातही झाली असावी. विविध सामाजिक जाणिवांचीच अभिव्यक्ती साहित्यातून होत असते असे मानणारा जीवनवादी साहित्य प्रवाहही आज अस्तित्वात असलेला दिसतो. या साहित्य प्रवाहाच्या अनुषंगाने विचार केल्यास आज या प्रवाहातील साहित्य मोठ्या प्रमाणात लिहिले जात आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण प्रसारामुळे विज्ञानवादी विचारधारेचा प्रचार व प्रसार सर्व स्तरापर्यंत पोहोचला. अनेक समाजप्रवाह शिक्षणाने जागृत झाले. त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची त्यांना जाणिव झाली. त्यातूनच 1960 च्या दरम्यान विविध सामाजिक चळवळी उदयाला आल्या. या सर्व चळवळींनी आपली विचारधारा व तत्त्वज्ञान समाजापर्यंत पोहचवण्यासाठी साहित्य या माध्यमाचा उपयोग केला. त्यातूनच दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी, जनवादी, बालसाहित्य हे विविध साहित्यप्रवाह उदयाला आले. यातच मुस्लिम मराठी साहित्य प्रवाहाचाही उदय उल्लेखनिय आहे.

या सर्व साहित्य प्रवाहातील विविध समाजघटकातील लेखकांनी कथा, कविता, कादंबरी, आत्मकथन, प्रवासवर्णन, नाटक, लोकनाट्य या विविध वाङ्मयप्रकारात आपले जीवनानुभव कलात्मकपणे आविष्कृत केले. यातील प्रत्येक प्रवाहांचे तत्त्वज्ञान व विचारसूत्र जरी वेगवेगळे असले तरी परीवर्तन हेच सर्वांचे प्रयोजन असलेले दिसते.

या दृष्टीने मराठीतील मुस्लिम साहित्याचा विचार करताना त्यात विविधांगीपणा दिसून येतो. मोहम्मद पैगंबराचा मुल्यविचार हे या साहित्याचे उर्जाकेंद्र एकेश्वरवादाचा स्वीकार, मुर्तिपूजेचा नकार, अनाथांचे संरक्षण, अनैतिक वर्तनाचा त्याग आणि सदाचाराचा स्वीकार या आदर्श तत्त्वांचा प्रचार व प्रसार या साहित्यातून मोठ्या

प्रमाणात होताना दिसतो. हेच विचारसूत्र घेऊन कथा, कविता, कादंबरी, आत्मचरित्र, वैचारिक साहित्य याशिवाय इतरही विविध वाङ्मयप्रकारातून हा विचार आज अनेक मुस्लिम साहित्यिक साहित्यातून प्रकट करत असताना दिसत आहे. मी मुस्लिम समुदायात वाढल्यामुळे सभोवतालचे सामाजिक वास्तव बालपणापासूनच पहात आलो आहे. मुस्लिम संस्कृती, मुस्लिम धर्माची शिकवण, मुस्लिम समाजाच्या समस्या, मुस्लिम समुहाची भाषा या विविध विषयाच्या अनुषंगाने माझ्या मनात कुतुहल निर्माण झाले. मला बालपणापासूनच साहित्य वाचनाची आवड असल्याने मराठीतील मुस्लिम साहित्य प्रवाहातील कांही साहित्यकृतीचे सुक्ष्म अध्ययन मी केले आहे. त्यातून या साहित्य प्रवाहातील विचारधारा आणि सामाजिक वास्तव यांत कांही प्रमाणात सुसंगती व कांही प्रमाणात विसंगती असल्याचे मला आढळून आले.

कोणत्याही समाज समुहात स्त्रीला दुय्यम मानण्याची प्रथा आहे. भारतीय समाजात खरे तर स्त्रीचा विविध रूपात तिचे मातृत्व हे रूप सर्वश्रेष्ठ आहे. तरीही स्त्रीची अवहेलना केली जाते. स्त्री ही संशोधकच आहे. तिनेच शेती, अग्नी या क्रांतीकारी घटनांचा शोध लावला. परंतु पुरूषप्रधान संस्कृतीत तिची सदैव घुसमट झालेली दिसते. मुस्लिम मराठी साहित्याचे वाचन करतांना माझ्या मनात मुस्लिम समुहातील स्त्री जाणीवांचा शोध घेण्याची आवड निर्माण झाली. त्याबरोबरच मुस्लिम स्त्रियांचा समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कशा प्रकारचा आहे. याचाही शोध मला घ्यावासा वाटला. मुस्लिम मराठी साहित्यात स्त्रियांनी कथा, कविता, वैचारिक साहित्य या वाङ्मयप्रकारात मोलाची भर घातलीच तसेच आत्मचरित्र या वाङ्मय प्रकारातूनही त्यांनी विपूल लेखन केले. मुस्लिम समुदायात जीवन जगत असतांना वेळोवेळी मला जे विविध प्रश्न पडत गेले त्याची कांही उत्तरे काही साहित्यकृतीतून मला अस्पष्टपणे मिळाली परंतु त्यातून माझे कांही समाधान झाले नाही. म्हणून या समुहाच्या, संस्कृतीच्या, धार्मिकतेच्या व सुष्ट आणि दुष्ट प्रवृत्तींचा आपण सखोल शोध घेतला

पाहिजे असे मला सातत्याने वाटत आले. हा शोध घेण्यासाठी इतर वाङ्मयप्रकारापेक्षा मुस्लिम समुहातील स्त्रियांनी लिहिलेला 'आत्मचरित्र' हा वाङ्मयप्रकार मला जवळचा वाटला. त्यातही स्त्रियांची आत्मचरित्रे मला अभ्यासावी वाटली. कारण स्त्री समाजाचा केंद्रबिंदूच आहे. तिच्या विविध जाणिवांतून, संकल्पनातून, दृष्टिकोनातून आणि समज-गैरसमजातून समाजजीवनात अनेक घटना घडत असतात. इतर वाङ्मयप्रकारांपेक्षा आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारातून वास्तव जीवन मोठ्या प्रमाणात व्यक्त झाले आहे. येथे कल्पनेला फारसा वाव नाही म्हणून मुस्लिम समाजाचे सामाजिक वास्तव शोधण्याच्या भुमिकेतून मी प्रस्तुत 'साठोत्तरी मराठी मुस्लिम स्त्री आत्मचरित्राचा विवेचक अभ्यास' हा विषय निवडलेला आहे. प्रस्तूत विषयाचा अभ्यास मी पुढील प्रकरणांच्या अनुषंगाने करणार आहे.

प्रकरण पहिले : मराठी आत्मचरित्रे संकल्पना व स्वरूप

संशोधनाच्या या पहिल्या प्रकरणातून मी आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारातील संकल्पना, व्याख्या व स्वरूप यांचा शोध घेणार आहे. त्याबरोबरच मराठी भाषेमध्ये लिहिलेली आत्मचरित्रे, त्यांचा उदय, त्यापाठीमागील पार्श्वभूमी, त्यातून आलेली विचारधारा, मराठी आत्मचरित्राची वाटचाल या आत्मचरित्रांची भाषा या सर्व बाबींचा शोध घेणार आहे.

प्रकरण दुसरे : मुस्लिम मराठी साहित्य व आत्मचरित्रे

या दुसऱ्या प्रकरणात मी मराठी भाषेत लिहिले गेलेले एकूण साहित्य, त्यातील मुस्लिम मराठी साहित्याचे स्थान यांचा शोध घेत असतांना या प्रवाहातील आत्मचरित्राचे स्वरूप, त्याची वाटचाल आणि वेगळेपण या अनुषंगाने अध्ययन करणार आहे.

प्रकरण तिसरे : मराठी मुस्लिम स्त्री आत्मचरित्रातील समस्या

साठोत्तरी साहित्य प्रवाह हा विविध जाणीवांनी समृद्ध असलेला प्रवाह आहे. त्यातील विविध प्रवाहातून सामाजिक समृद्धता, धार्मिक आचार धर्म, सांस्कृतिक जीवनाचे विविध पैलू जसे अविष्कृत होतात तसेच त्यातून सामाजिक समस्याही लेखकाने संवेदनशीलतेने मांडलेल्या असतात. मराठीतील मुस्लिम साहित्य याला अपवाद नाही. या साहित्यातूनही अनेक सामाजिक समस्या आविष्कृत झालेल्या आहेत. या साहित्यातील आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारातून व्यक्त झालेल्या स्त्रीविषयक समस्या, सामाजिक समस्या, आर्थिक समस्या याशिवाय या समाजातील रूढी, प्रथा, परंपरा, कर्मकांड विविध आख्यायिका, लोक समजूती व चालीरीती यांचाही शोध मी घेणार आहे.

प्रकरण चौथे : मराठी मुस्लिम स्त्री आत्मचरित्रातील मुस्लिम संस्कृतीचे चित्रण

कोणत्याही साहित्य कृतीतून लेखक ज्या समाजात जीवन जगतो. त्या समाजाचे त्याच्यावर संस्कार झालेले असतात. त्या संस्कारातूनच त्याचे व्यक्तिमत्त्व विकसित झालेले असते. म्हणूनच कोणत्याही साहित्य कृतीतून त्या-त्या लेखकाच्या समुहाची, समाजाची एक संस्कृती व्यक्त झालेली असते. मराठीतील मुस्लिम स्त्री आत्मचरित्रातून मुस्लिम स्त्रियांनी या मुस्लिम संस्कृतीचे दर्शन जागोजागी घडविले आहे. या संस्कृतीतील सण-उत्सव, खान-पान, वेशभुषा, विवाह पद्धती या संदर्भाने स्त्री जाणीवेतून आलेले चित्रण अत्यंत संशोधनीय आहे. त्याचा शोध मला या प्रकरणातून घ्यावयाचा आहे.

प्रकरण पाचवे : मराठी मुस्लिम स्त्री आत्मचरित्रातील इस्लाम धर्माची शिकवण व सामाजिक वास्तव

जगातील कोणताही धर्म हा मानवतेची, सदाचाराची, आणि एकात्मतेचीच शिकवण देतो परंतु धर्मात वावरणारे धर्ममार्तंड हे त्या धर्माच्या आदर्श शिकवणुकीचे विकृतीकरण करतात. पर्यायाने समाज त्या शिकवणुकीच्या विरूद्ध जाताना दिसतो. इस्लाम धर्महीं याला अपवाद नाही. या धर्मातील स्त्री आत्मचिरत्रातून आलेली धर्माची शिकवण, त्यातील सदाचार, तत्त्वज्ञान, मोहम्मद पैगंबराचे चित्रण, एकेश्वरवाद, विज्ञाननिष्ठा, विवेक निष्ठा या मानवी जीवनाला सुखकर करणाऱ्या विविध मुल्यांचा प्रत्ययय ही आत्मचरित्रे अभ्यासताना येतो. तसेच या आदर्श मुल्यांपासून पूर्णपणे परावृत्त झालेला समाज शोधणे हे माझ्या संशोधनाचे उद्दिष्ट आहे.

प्रकरण सहावे : मराठी मुस्लिम स्त्री आत्मचरित्रांचा वाङ्मयीन दृष्टीकोनातून अभ्यास

'आत्मचरित्र' या वाङ्मय प्रकाराचा अभ्यास करताना आत्मचरित्राच्या रचनातंत्रापासून ते वाङ्मयीन गुणविशेषासहित सर्वांगीण अभ्यास होणे आवश्यक आहे. आत्मचरित्र हे वैशिष्ट्यपूर्ण व आकर्षक करण्यासाठी लेखक हा आपल्या कलाकृतीत कांही वाङ्मयीन गुणविशेषाची योजना करत असतो. त्यामुळे आपली कलाकृती वेगळी ठरावी, वाङ्मयात तिचे स्थान असावे असा त्याचा हेतू असतो. वातावरणनिर्मिती, संवादकौशल्य, भाषाशैली, निवेदन, पात्रचित्रण, घटनाप्रसंग, प्रतिमा-प्रतिके, वाक्प्रचार, म्हणी, बोली अशा कांही वाङ्मयीन गुणवैशिष्ट्यांद्वारे स्त्री आत्मचरित्रांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात मी करणार आहे.

प्रकरण सातवे : उपसंहार

'मराठी मुस्लिम स्त्री आत्मचरित्रांचा विवेचक अभ्यास' या संशोधन विषयाच्या उपरोक्त विविध प्रकरणाच्या आधारे केलेल्या अभ्यासातून निघणारे विविध निष्कर्ष मी या प्रकरणात नोंदविणार आहे. तसेच या संशोधनासाठी मी वापरलेल्या संशोधन पद्धतीचाही आढावा या प्रकरणातून मला घ्यावयाचा आहे.

संदर्भग्रंथ सूची :

१) फ.म. शहाजिंदे : 'मुस्लिम मराठी साहित्य : परंपरा, स्वरूप आणि लेखकसूची,' भूमी प्रकाशन, लातूर प्रथमावृत्ती.

२) डॉ. शकील शेख : 'मुस्लिम मराठी आत्मचरित्रे : एक चिकित्सक अभ्यास' अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर, प्रथमावृत्ती.

३) डॉ. राजेखान शानेदिवाण : 'मुस्लिम आत्मचरित्रे : एक दृष्टिक्षेप, भूमी प्रकाशन, लातूर. प्रथमावृत्ती.

४) डॉ. विमल भालेराव : 'आधुनिक मराठी वाङ्मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे एक अभ्यास', नागपूर प्रकाशन.

५) सदा कऱ्हाडे : 'चरित्र आणि आत्मचरित्र', मुंबई प्रकाशन, प्रथमावृत्ती.

संशोधक

शेख लतीफ मैनोद्दीन

(एम.ए., बी.एड्., एम. फिल्.)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. लहू दिगंबर वाघमारे

संशोधन मार्गदर्शक तथा मराठी विभागप्रमुख,

शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

ता. चाकूर, जि. लातूर (महाराष्ट्र)